# लातूर शहर महानगरपालिका, लातूर

सार्वजनिक आरोग्य विभाग

फोन – 02382- 246075, 242803, 252852

फॅक्स – 02382 - 246074

वेबसाईट- www.mclatur.org


जा.क्र. लाशमनपा/आरोग्य वि/ 7911 /2023

दिनांक - 13/12/2023

## जाहीर प्रगटन

### दवाखान्यासाठी भाड्याने जागा देण्यासाठी ईच्छुकांनी अर्ज दाखल करणे बाबत

शहरातील नागरिकांना घराजवळच आरोग्य व वैद्यकीय सुविधा मिळाव्यात यासाठी महानगरपालिका राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत शहरांमध्ये विविध भागात आणखीन ११ नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र चालू करणार आहे सदरील नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र भाड्याच्या जागेत चालू करण्यात येणार आहेत.

तरी याद्वारे आवाहन करण्यात येते की ज्या इच्छुक नागरिकांकडे स्वतःच्या नावे असलेल्या जागेत किमान 500 ते 1000 चौ.फूट बांधकामाचे आकारमान असलेल्या सद्यस्थितीतील तीन-चार खोल्या उपलब्ध आहेत त्यांनी लातूर मनपाकडे दि.१८.१२.२०२३ रोजी पर्यंत अपेक्षित मासिक भाड्यासह अर्ज सादर करावेत. या ठिकाणी स्वच्छतागृह, वॉशबेसिन, नळ कनेक्शन, वीज कनेक्शन उपलब्ध असणे आवश्यक आहे. जागेची पाहणी करून बांधकाम विभागाने निश्चित करून दिलेल्या मासिक भाड्यानुसार मालकासोबत 11 महिन्याचा भाडेकरार करण्यात येईल. मनपाने सुचविल्याप्रमाणे आवश्यक किरकोळ दुरुस्ती जागा मालकास करून द्यावी लागेल. आवश्यकतेनुसार भाडेकरार पुढील वर्षी / दरवर्षी वाढविण्यात येईल. भाडेकरार करण्यापूर्वी जागेचा मालमत्ता कर, पाणीपट्टी, विद्युत देयके इ.जागा मालकाने भरलेला असणे आवश्यक आहे. तसेच जागेवर कोणत्याही प्रकारचा बोजा असल्यास तो अर्ज ग्राह्य धरला जाणार नाही व याबाबतीत कायदेशीर बाबी उद्भवल्यास संबंधीत जागा मालकाची जबाबदारी राहील.

तरी मनपास भाड्याने जागा देवू इच्छिणाऱ्या नागरिकांनी आपल्या जागेच्या कागदपत्रासह दि.१८.१२.२०२३ रोजी पर्यंत आयुक्त, महानगरपालिका यांच्या नावे मुख्य कार्यालय आरोग्य विभाग येथे अर्ज सादर करावेत असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

लातूर शहर महानगरपालिका लातूर
नागरी आरोग्य केंद्र
जावक क्र 7911
दिनांक 13-12-23
विभागाचे नाव
लिपिकाची स्वाक्षरी

आयुक्त
लातूर शहर महानगरपालिका, लातूर